# दहावीच्या अनुसूचित विद्यार्थ्यांना प्रोत्साहन भत्ता

## अकरावी-बारावीसाठी दोन लाख रुपये मिळणार

**सकाळ न्यूज नेटवर्क**

मुंबई, ता. २४ : दहावीच्या परीक्षेत उत्तम गुण मिळवूनही पुढील शिक्षणाबाबत गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांसमोर अंधकार असतो. अशा अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना दहावीच्या परीक्षेत ९० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळाल्यास त्यांना ११ वी आणि १२ परीक्षेची तयारी करण्यासाठी दोन वर्षांत दोन लाख रुपयांचे अनुदान देण्याची घोषणा सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे यांनी केली. तसेच या योजनेमधील लाभार्थी संख्या मर्यादित नसल्याने अधिक गरजूंना या योजनेचा लाभ घेता येणार आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने ही योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न २.५ लाख पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या, कमी वेतनावर किंवा कंत्राटी स्वरूपात किंवा खासगी क्षेत्रात काम करणाऱ्या गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची पूर्वतयारी करण्यासाठी ही योजना फायदेशीर ठरणार आहे. अनुसूचित जातीतील गरीब कुटुंबातील मुलांना एमएच-सीईटी, जेईई, नीटसारख्या व्यावसायिक अभयसक्रमांच्या पूर्वतयारीसाठी ही रक्कम लाभदायक ठरेल. या योजनेची पारदर्शक अंमलबजावणी करण्याची जबाबदारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेवर (बार्टी) असेल.



### खालील अटींची पूर्तता आवश्यक...

- विद्यार्थ्यांच्या पालकांचे एकूण वार्षिक उत्पन्न २.५ लाखांच्या आत असणे आवश्यक
- उत्पन्नाचा व जातीचा प्रमाणित दाखला अनिवार्य
- शासकीय सेवेत नोकरीला असणाऱ्या पालकांच्या पाल्यांना ही योजना लागू असणार नाही.